





दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA








vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७




● बीड/महाराष्ट्र ● सोमवार १८ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २१५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


# मोदी का परिवार वरून प्रकाश आंबेडकर यांनी भाजपला घेरलं

## पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला






**वादळवार्ता/मुंबई**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रेचा आज मुंबईत समारोप झाला. इंडिया आघाडीचे शिवतीर्थावर शक्ती प्रदर्शन झाले. देशातील सर्व विरोधी पक्षांचे प्रमुख नेते शिवाजी पार्कवर उपस्थित होते.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख नेते प्रकाश आंबेडकर यांनी भाजपच्या 'मोदी का परिवार' वरून पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला. आपल्याला लढलं पाहिजे. सोबत लढू किंवा एकटे लढू पण लढलं पाहिजे. मी देशभरातील परिस्थिती सांगत आहे.कारण बंगालमध्ये वेगळी परिस्थिती आहे. महाराष्ट्रात एकत्र लढण्याचा प्रयत्न सुरू आहेत. पण दोन गोष्टी आहेत. त्या मोठ्या आहेत, हे मला वाटते. इलेक्ट्रॉल बाँड आलं आहे. प्रत्येक चॅनलवर अमित शाह यांची प्रतिक्रिया देत आहेत की आम्ही काळापैसा पळवून लावला असं अमित शाह म्हणत आहे. मोदींना तुम्ही इलेक्ट्रॉल बाँडवरून सवाल विचारणार की नाही ?

अमित शाह यांनी त्या कंपनीकडे १३०० कोटी रुपये आले कुठून याचं उत्तर द्यावं. त्या कंपनीची ईडी चौकशी केली पाहिजे. मोदी म्हणतात देश आपलं कुटुंब आहे. देश त्यांचं कुटुंब आहे. पण त्यांच्या खऱ्या कुटुंबातील एक महिला त्यांच्यासोबत राहत नाही, मोदी पुन्हा पंतप्रधान होणार नाही, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.

### हिंदू समाजात कुटुंबाचं नातं सर्वात गहन असतं.

आपण या मुद्द्याला उचललेल पाहिजे मोदींनी ते नातं निभावलं पाहिजे. मोदींनी त्यांच्या पत्नीसोबत राहावं. खरगे जेव्हा बोलतील. त्यावर ते बोलतील अशी आशा आहे. कारण मोदी हिंदू संस्कृती आणि हिंदू रिवाजाची गोष्ट करतात. पण ते मानत नाही. वयक्तीक गोष्ट आहे. मी मानतो. पण संस्कृतीची चर्चा संघाने सुरू केली. ते जर संस्कृती पाळत नसतील तर त्यांना आपण समजावलं पाहिजे. त्याच्यासाठी आपण लढलं पाहिजे, असं प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं आहे.

# दिव्यांगांना उपयोगी साहित्याचे वाटप




**दैनिक वादळ वार्ता**

जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, नवाथे नगर बडनेरा रोड अमरावती व्दारा, बुधवार दि.13 मार्च 2024 रोजी दिव्यांग बांधवांना मोटोराईज सायकल, तीन चाकी सायकल,श्रवणयंत्रे, शैक्षणिक संच,कॅलीपरस या उपयुक्त साधनांचे वितरण, महाराष्ट्र राज्याच्या दिव्यांग विभागाचे अध्यक्ष मा.बच्चुभाऊ कडू, सौरभ कटियार जिल्हाधिकारी अमरावती, मा.श्री.जोशी (अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती), मा.श्री. दिलीप एडतकर संपादक दै.विदर्भ मतदार, प्रहारचे रोशन देशमुख, सुनिल राऊत, अरविंद डबरे, रितेश शर्मा, बंटी रामटेके, गोलू पाटील, विनायक मंजलवार, वैकुंठ तायवाडे, संदिप इंगोले, श्याम राजपुत, राजेशभाऊ कडू, जाधवर जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद अमरावती, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र अमरावतीचे संचालक व कार्यक्रमाचे आयोजक किशोर बोरकर व संस्था सचिव श्री.दिलीप तानोळकर व प्रकल्प संचालक राजु कोडे, या मान्यवरांचे उपस्थित वितरण करण्यात आले

# विदेशातील टेकनिक वापरुन पारनेर येथील खंडेरायाकडे जाणारा रस्ता तयार केला

**वादळवार्ता/पाटोदा**

पाटोदा तालुक्यातील पारनेर येथील हाजारो लोकाचे श्रध्दास्थान असलेल्या खंडोबा मंदिराकडे जाण्यासाठी अनेक वर्षांपासून रस्ता नसल्याने खंडेरायाच्या भक्तांना खुप त्रास सहन करावा लागत होता मात्र या रस्त्याच्या कामाला निधी मंजूर झाल्यामुळे लाखो रुपय निधी मंजूर झाल्यामुळे रस्त्याचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न सुटला




मनोज आर्सुळ यांनी मंदिरा कडे जाणारा रस्ता असल्यामुळे ना नफा ना तोटा या तत्त्वावर काम करत आहे. विशेष म्हणजे पारनेर परिसरात प्रथमच अत्याधुनिक मशिनरी व विदेशातील टेकनिक वापरुन खंडोबा मंदिर परिसरातील रस्ता चांगला केल्याचे बोलले जात आहे खंडेरायाचे भक्त आंनदी झाले असुन मनोज आसुळ यांनी रस्त्याचे काम चांगल्या प्रकारचे झाल्याने परिसरातील लोक समाधानी झाले आहेत.

# सरकार फार्मास्युटिकल फर्मसाठी मार्केटिंग कोड जारी

**दैनिक वादळ वार्तापुणे /पंकज भंडारी**

फार्मास्युटिकल्स विभागाने मंगळवारी औषधांसाठी "सुरक्षित" आणि "नवीन" शब्द वापरण्याचे नियम निर्दिष्ट करून, फार्मास्युटिकल मार्केटिंग प्रॅक्टिसेस (UCPMP), 2024 साठी एकसमान संहिता जारी केली आणि सांगितले की वैद्यकीय प्रतिनिधी मुलाखत घेण्यासाठी कोणतेही प्रलोभन किंवा सबटरफ्यूज वापरू नये आणि त्यांनी आरोग्यसेवा व्यावसायिकांना प्रवेश देण्यासाठी कोणत्याही नावाखाली पैसे देऊ नयेत. कंटिन्युइंग मेडिकल एज्युकेशन (सीएमई) साठी हेल्थकेअर प्रोफेशनल्ससह फार्मास्युटिकल उद्योगाच्या सहभागास केवळ चांगल्या-परिभाषित, पारदर्शक आणि सत्यापित करण्यायोग्य मार्गदर्शक तत्त्वांच्या संचाद्वारे परवानगी दिली जावी. राज्याच्या ठिकाणी अशा घटना घडवण्यास



एकसमान संहितेद्वारे प्रतिबंधित आहे. भेटवस्तू देण्यास मनाई आहे कंपन्या किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी कोणत्याही आरोग्यसेवा व्यावसायिकांना किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना (तात्काळ आणि विस्तारित दोन्ही) कोणत्याही सबबीखाली रोख किंवा आर्थिक अनुदान देऊ नये. कोणत्याही फार्मास्युटिकल कंपनीने किंवा तिच्या एजंटला, म्हणजे वितरक, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते आणि इतरांना भेटवस्तू देण्यास मनाई आहे. याव्यतिरिक्त, कोणत्याही फार्मास्युटिकल कंपनी किंवा तिच्या एजंटद्वारे औषधे लिहून देण्यासाठी किंवा पुरवठा करण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीला कोणताही आर्थिक फायदा किंवा प्रकारचा लाभ देऊ, पुरवला किंवा वचन दिले जाऊ शकत नाही. यूसीपीएमपीला काटेकोरपणे पालन करण्यासाठी परिपत्रक काढले जाईल, असे त्यात म्हटले आहे. औषधांबाबत, UCPMP म्हणते की औषधाची जाहिरात त्याच्या विपणन मान्यतेच्या अटींशी सुसंगत असणे आवश्यक आहे आणि सक्षम अधिकाऱ्याकडून त्याच्या विपणन मंजूरी मिळण्यापूर्वी औषधाची जाहिरात केली जाऊ नये. "एखाद्या औषधाच्या उपयुक्ततेचे दावे सर्व उपलब्ध पुराव्याच्या अद्ययावत मूल्यमापनावर आधारित असले पाहिजेत. 'सुरक्षित' हा शब्द पात्रतेशिवाय वापरला जाऊ नये, आणि हे स्पष्टपणे सांगितले जाऊ नये की औषधाचे कोणतेही दुष्परिणाम, विषारी धोके किंवा व्यसनाचा धोका नसतो. 'नवीन' हा शब्द सामान्यपणे उपलब्ध असलेल्या कोणत्याही औषधाचे वर्णन करण्यासाठी किंवा भारतात सामान्यतः प्रचारित केलेल्या कोणत्याही उपचारात्मक हस्तक्षेपाचे वर्णन करण्यासाठी वापरला जाऊ नये. एक वर्षापेक्षा जास्त काळ.

## लोकसभा निवडणूक

### महाराष्ट्र सरकारमध्ये नेते नाहीत, फक्त डिलर; तेजस्वी यादव



काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेचा आज मुंबईत समारोप होतोय. या यात्रेच्या समारोपाच्या निमित्ताने मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज पार्क मैदानात आज इंडिया आघाडीची आज भव्य सभा आयोजित करण्यात आलीय. या सभेला देशभरातील इंडिया आघाडीचे दिग्गज नेते उपस्थित आहेत. या सभेत बिहारचे माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी महाराष्ट्र सरकारवर जोरदार निशाणा साधला. "महाराष्ट्र सरकारमध्ये नेते नाहीत, फक्त डिलर आहेत", असा घणाघात तेजस्वी यादव यांनी केला. "महाराष्ट्र सरकारमध्ये जेवढे लोक बसले आहेत. त्यातील एकही नेता नाही. ते फक्त डीलर आहे. उद्धव ठाकरेंच्या नावाने मते घेतात

### देशातील हे चेहरे ठरवणार लोकसभा ची दशा आणि दिशा



शात लोकसभा निवडणुकीचा उत्सव सुरु झाला आहे. पक्षांचे जागावाटप जाहीर झाल्यानंतर नेत्यांच्या प्रचाराची रणधुमाळी सुरु होईल. आरोप – प्रत्यारोप होतील. जाहीर टीका केली जाईल. आपल्या वक्तृत्व शैलीने सर्वांचे लक्ष वेधून घेणारे अनेक तगडे वक्ते आणि नेते निवडणुकीच्या मैदानात उतरलेले दिसतील. तर, काही नेते पडद्याआड राहून पक्षाच्या विजयासाठी रणनीती तयार करतील. त्यामुळे वक्ते आणि पडद्याआडचे अशा सर्वच प्रमुख नेत्यांकडे, रणनीतीकारांकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याप्रमाणेच देशात 10 असे प्रमुख नेते आहेत

### संकटमोचक गिरीश महाजन डॅमेज कंट्रोलसाठी सोलापुरात



माढ्याचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारी दिल्याने भाजप नेते धैर्यशील मोहिते पाटील हे नाराज झाले आहेत. धैर्यशील मोहिते पाटील हे माढ्यातून लोकसभा निवडणुकीसाठी इच्छुक होते. पण पक्षाकडून रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना उमेदवारी देण्यात आल्याने धैर्यशील मोहिते पाटील नाराज झाले आहेत. त्यांनी आज अकलूज येथे त्यांच्या शिवरत्न बंगल्यावर बैठक बोलावलेली. या बैठकीला फलटणचे माजी मंत्री रामराजे निंबाळकर, शेकापचे जयंत पाटील, करमाळ्याचे माजी आमदार नारायण आबा पाटील यांच्यासह नेत्यांची उपस्थिती होती.

# मुलांना भरपूर कमवून ठेवण्यापेक्षा कमावण्याच्या लायकीचे बनवा - प्रा. कांबळे

## लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल मध्ये पालक मेळावा संपन्न

**वादळवार्ता/पाटोदा**

पालकांनी आपल्या पाल्यांच्या आवडी काय आहेत त्याचा शोध कोणी मुलांच्या मानसिक विकासाकडे लक्ष दिले पाहिजे कोल्हापूर वाढत्या उपेक्षा न ठेवता व त्याची इतरांशी तुलना न करता त्याला कमकुवत बनव बनवण्यापेक्षा त्याचा सर्वांगीण विकासाकडे लक्ष दिले पाहिजे पालकांनी मुलांना भरपूर करून ठेवण्यापेक्षा आपले मुलांना कमावण्याच्या लायकीची बनवावे असे प्रतिपादन प्राध्यापक नागसेन कांबळे यांनी बोलताना व्यक्त केले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लेटर्स फ्लावर स्कूलचे प्राचार्य नसीर पठाण होते पाटोदा येथील लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल मध्ये, नुकताच महिलादिन आणि पालक मार्गदर्शन मेळावा संपन्न झाला. यावेळी स्कूल चे शिक्षक अर्जुन सानप सर, आणि उज्वला मिस यांनी महिला दिनानिमित्त महिला पालकांना शुभेच्छा देऊन महिला सक्षमी करण आणि महिलांनी उच्च शिक्षण घ्यावे असे आवाहन केले प्रमुख पाहुणे नागसेन कांबळे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की शाळेच्या मुलांची बौद्धिक विकासाची जबाबदारी शिक्षकांची आहे परंतु पालकांनी आपल्या पाल्याच्या आहार विहार व शारीरिक विकासाकडे लक्ष दिल्याशिवाय आदर्श विद्यार्थी घडणार नाहीत त्यासाठी खऱ्या अर्थाने पालक सकारात्मक, मानसिक दृष्टिकोनातून पालकत्व साठी जागरूक होणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येक मुलांकडे त्यांच्या पालकांनी मुलांच्या वयानुसार त्यांना वेळ देणे आवश्यक आहे. म्हणजेच जास्तं पैसे कमवून ठेवण्यापेक्षा त्यांना योग्य वेळ देऊन मुलांनाच कमविण्याच्या लायकीचे बनवा. मुलांना दर्जेदार शिक्षण देऊन त्यांना सक्षम बनवा पालकांनी आपल्या पाल्याचां मी पालक आहे की मालक हे आधी ठरवले पाहिजे, पालक हा मार्गदाता असल्याने त्याने आपल्या पाल्याच्या आवडी निवडी शोधून त्याच्या मानसिक विकासाकडे लक्ष दिले पाहिजे, वाढत्या अपेक्षा व इतरांशी तुलना करून मुलांना मानसिक रित्या कमकुवत बनवू नये. या स्पर्धा परीक्षांच्या युगामध्ये मुलांचे बालपण हरवले आहे. मुलांना शाळा आणि ट्यूशन्स विद्यार्थ्यांचा अधिक वेळ खर्ची पडतआहे, त्यना सवतचा अभ्यास करायला वेळ मिळत नाही.यातून आज काल अवाजवी अपेक्षा ठेऊन पालक वर्ग चिमुकल्या विद्यार्थ्यांचा मानसिक छळ तर करत नाहीना हे तपासण्याची वेळ आली आहे. असे शिक्षण तज्ञ नागसेन कांबळे यांनी आपल्या अभ्यासपूर्ण विवेचनात मत मांडले. साठी सर्व श्रेष्ठ गिफ्ट आई असते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लिट्ल फ्लॉवर स्कूल प्राचार्य पठाण




सर यांनी सांगितले की, फक्त डिग्री मिळवणे म्हणजे शिक्षण नाही तर विद्यार्थी सर्व गुणसंपन्न बनले पाहिजेत. त्यासाठी पलकणी विविध उपक्रमात मुलांना सहभागी केले पाहिजे. प्राचार्य पठाण म्हणाले की मुलांसाठी सर्वश्रेष्ठ गिफ्ट म्हणजे आई असते. कारण आई हीच मुलाची पहिली शिक्षिका असते चांगले संस्कार आई करते मुलाच्या सवडी, आवडी, निवडी आणि आरोग्य हे आईच समजू शकते. मुलांना घरातूनच योग्य मार्गदर्शन पालक करत असतात त्यासाठी आपल्या चिमुकल्या मुलांना समजून घ्या, मुले वयात आल्यावर मुलांबरोबर मैत्रीपूर्ण संबंध ठेवा त्यांना मायेने जवळ घ्या त्याच्या चांगल्या गुणांचे कौतुक करा त्यांना प्रोत्साहित करा असे प्रतिपादन यावेळी केले. शाळेचा विद्यार्थी दिग्विजय जगदाळे याने सोलो पखवाज वादन करून पालकांची मने जिंकली आहेत. शाळेच्या मुली ग्रिष्मा घुमरे, गार्गी घुमरे, दिव्या चौरे, यांनी उकृष्ट इंग्लिश आणि मराठी मध्ये भाषणे केलीत. यावेळी अवनी तांभाळे या मुलीने बहारदार नृत्य सादर केले. पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. या वेळी स्कूलच्या सर्वच शिक्षिका आणि शिक्षक यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घतले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन कार्यक्रम प्रमुख सीमा माळी यांनी केले.

## संपादकीय

### उन्हाळ्याच्या दिवसात या पदार्थांचा जेवणात समावेश करा

मार्च महिन्याच्या मध्यावधीत आपण आहोत. सध्या उन्हाचा कडाका प्रचंड वाढला आहे. या वाढत्या उन्हामुळे अनेक समस्या जाणवू शकतात. अनेकदा आपण आजारीही पडू शकतो. अनेकांना उष्माघाताचा त्रास होतो. मात्र आहारात थोडासा बदल केला तर आपण या कडक उन्हाळ्यातही निरोगी राहू शकतो. त्यासाठी रोजच्या खानपानाच्या सवयींमध्ये तुम्हाला थोडा बदल करावा लागेल. काही पौष्टिक पदार्थांचा आहारात समावेश केल्यास तुम्हाला त्रास जाणवणार नाही. हे पदार्थ नेमके कोणते आहेत? कोणत्या फळांचा ज्यूस प्यावा? जाणून घेऊयात…आहारात कोणत्या पदार्थांचा समावेश कराल?मौसम कोणताही असो. तुमचा आहार तुमच्या शरिरावर परिणाम करतो. त्यामुळे सकस आहार असेल याची काळजी नेहमीच घेतली पाहिजे. शक्यतो लहानपणापासून खास आलेली भाजी – पोळी याचा जेवणात समावेश असू द्या.

या उन्हाळ्याच्या मौसमात तुम्हाला तुमच्या आहारात काही बदल करावा लागेल. तसं केल्यास तुमच्या शरिरात सकारात्मक बदल दिसतील. रोजच्या जेवणात एक तरी पातळ भाजी असेल याची काळजी घ्या. शिवाय गाजर, काकडी या सारख्या फळांचाही जेवणात समावेश करा. तसंच जेवताना तुम्ही दही देखील खाऊ शकता. यामुळे तुमच्या शरिराचं तापमान कमी होण्यास मदत होईल.

फळं खावीत…उन्हाळ्याच्या दिवसात शरिरात पाण्याची कमतरता जाणवू शकते. त्यामुळे जास्तीत जास्त पाणीदार फळांचा जेवणात समावेश करा. कलिंगड, खरबूज, द्राक्षे या सारखी फळं रोज खालली जातील, याकडे लक्ष द्या.ज्यूस आणि ताकउन्हाळ्याच्या दिवसात जितकं पाणी तुमच्या शरिरात जाईल, तितकं चांगलं…. त्यासाठी दिवसातून किमान एखादा तरी ज्यूस प्या… यात कलिंगड, खरबूज, पाईनॲपल या फळांचा समावेश असू द्या. याशिवाय जितकं ताक प्याल तितकं शरिर ताजं तवानं राहतं. त्यामुळे शक्य होईल तेव्हा ताक आणि लस्सी प्या. याशिवाय जास्तीत जास्त पाणी प्या.

टीप- ही माहिती सामान्य माहितीच्या आधारावर आहे. जर तुम्हाला अधिकची माहिती हवी असेल तर तज्ज्ञ डॉक्टरांशी संपर्क करा.



# सरकारदरबारी मानाच्या जागा!

विनायक लक्ष्मण ऊर्फ केरुनाना छत्रे हे प्राचीन भारतीय तसेच आधुनिक गणित व खगोलशास्त्र यांचे अभ्यासक होते. विष्णूशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, सुधारकाग्रणी गोपाळ गणेश आगरकर यांचे ते गुरू होते. केजीएन: श्री के.जी. निकोडे गुरूजी यांच्या संकलित लेखातून वाचा ज्ञानवर्धक माहिती... संपादक.

केरुनानांचा जन्म अलिबाग तालुक्यातल्या नागाव येथे दि.१६ मे १८२५ रोजी झाला. आई-वडिलांना बालपणीच अंतरल्याने त्यांना शिक्षणासाठी मुंबईस चुलत्यांकडे यावे लागले. त्यांच्यामुळेच केरुनानांना वाचनाची गोडी व कोणत्याही प्रश्नाकडे वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहण्याची सवय लागली. गणित, खगोल आणि पदार्थविज्ञानासारख्या कठीण शास्त्रांत त्यांना पुढे जी गती प्राप्त झाली, त्याचे मूळ त्यांना एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्ये आचार्य बाळशास्त्री जांभेकर व प्रो. आर्लिबार या व्यासंगी गुरूंकडून मिळालेल्या मूलभूत ज्ञानात सापडते. त्याच्या जोरावर केरुनानांनी प्रगल्भ ग्रंथांचे परिशीलन करून या विषयांवर घट्ट पकड बसण्याएवढे त्यातले प्रगत ज्ञान प्राप्त केले. याच्या जोडीला त्यांची असाधारण बुद्धिमत्ता लक्षात घेतली की, पुढे त्यांनी अध्यापन कौशल्य दाखवले आणि सरकारदरबारी त्यांना मिळालेल्या मानाच्या जागा मिळवल्या.

मुंबईस कुलाब्याच्या दांडीवर अंतरिक्ष चमत्कार व लोहचुंबक यांचे अनुभव घेण्यासाठी इ.स.१८४०मध्ये प्रो.आर्लिबार यांनी एक वेधशाळा काढली. तिथे केरुनानांची असिस्टंटच्या जागी नेमणूक करण्यात आली. अवघ्या १५व्या वर्षी द.म.५० रुपये पगारावर मिळालेल्या या नोकरीत नानांनी पुढली १० वर्षे जागरुकपणे हवामानशास्त्राचे प्रशिक्षण घेतले. पुढील आयुष्यात कोणतेही तत्त्व अथवा संकल्पना सिद्ध होऊन पडताळा आल्याशिवाय ते स्वीकारीत नसत, याचे मूळ या नोकरीत आढळते. इ.स.१८५१पासून त्यांच्या बदल्या पुणे कॉलेजचे नॉर्मल स्कूल, व्हर्नेक्युलर कॉलेज (याचे नाव पुढे ट्रेनिंग कॉलेज झाले.) आणि अहमदनगरच्या इंग्रजी शाळेचे हेडमास्तर अशा सरकारी संस्थांतून झाल्या. या प्रत्येक ठिकाणी गणित, सृष्टिशास्त्र व पदार्थविज्ञान हेच विषय ते जरुरीप्रमाणे इंग्रजी व मराठीत सराईतपणे शिकवीत असत. दरम्यान, त्यांनी इंजीनिअरिंग कॉलेजातसुद्धा सृष्टिशास्त्रावर व्याख्याने दिली.. मात्र १८६५ पासून सेवानिवृत्तीपर्यंत केरुनाना पुण्याच्या डेक्कन कॉलेजात स्थिरपणे होते. प्रोफेसर व शेवटी हंगामी प्राचार्य म्हणून जागोजागी जबाबदारीची पदे सांभाळूनसुद्धा आपल्या अध्यापनात कधी त्यांनी हयगय केली नाही की खंड पडू दिला नाही. मुलांना समजेल अशा सोप्या रीतीने शिकविण्याची त्यांची हातोटी त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांनी वाखाणलेली आहे. गणिताशिवाय विद्यार्थ्यांना इतर शास्त्रांचे थोडेबहुत ज्ञान देण्यावर त्यांचा कटाक्ष असे. विद्यार्थ्यांनी केव्हाही- कुठेही शंका विचारली तरी ते हसत-खेळत हरप्रयत्नाने तिची उकल करीत असत. चिपळूणकर-आगरकर या केरुनानांच्या नामवंत शिष्यांच्या चरित्रांत व ते दिवंगत झाल्यावर खुद्द आगरकरांनी लिहिलेल्या मृत्युलेखात त्यांचे विद्याव्यासंग, अध्यापन कौशल्य, स्वभावातील सौजन्य तसेच गरजू व गरीब विद्यार्थ्यांना आसरा देणे, प्रसंगी फी-पुस्तकांची त्यांची नड भागवणे, या गुणांचे प्रामुख्याने उल्लेख आलेले आहेत. त्यांनी केलेल्या आर्थिक मदतीचे ठळक उदाहरण म्हणजे, पहिल्या वर्षीच्या परीक्षेची फी भरायला आगरकरांजवळ पैसे नव्हते म्हणून एक नाटक लिहून ते, ती उभी करणार असल्याचे कळल्यावर केरुनानांनी त्यांनी अर्धवट लिहिलेल्या नाटकाचे कागद काढून घेऊन त्यांची फी भरून टाकली. मेजर कँडीच्या मराठीतून शालेय पुस्तके तयार करण्याच्या उपक्रमात केरुनानांनी सुबोध भाषेत लिहिलेली पुस्तके लोकप्रिय झाली. अंकगणितात मूलभूत क्रियांबरोबर कर्जव्यवहार, रोखे, सुतार व गवंडी यांच्या कामाची आकारणी इत्यादी व्यावहारिक उदाहरणे घातली आहेत. तर पदार्थविज्ञानात आजूबाजूच्या सृष्टीत घडणारे व्यापार, निसर्ग चमत्कार व पदार्थांचे गुणधर्म यांच्या परिचयाबरोबर प्रयोगासाठी लागणाऱ्या वस्तू व त्यांच्या किमती पुस्तकाच्या परिशिष्टात दिल्या आहेत. कधी कधी या पुस्तकात त्यांनी संवादाचे माध्यमही वापरले आहे. शास्त्रीय ज्ञान स्वभाषेत व्यक्त करण्यासाठी मुंबईत सन १८४८ साली स्थापन झालेल्या ज्ञान प्रसारक सभेच्या व्यासपीठावरून केरोपंतांनी हवा, भरतीओहोटी, कालज्ञान, सूर्यावरील डाग आणि पर्जन्यवृष्टी यांचा संबंध असे विविध विषयांवर १७ निबंध वाचले. त्यापैकी भरती-ओहोटीच्या निबंधात भरती अंतराच्या घनाच्या प्रमाणात कमी होते असे कलनाच्या मदतीने त्यांनी दाखवले आहे. केरुनानांनी लक्ष घातलेला आणखी एक विषय म्हणजे पंचांग शुद्धीकरणाचा. आपल्या सूक्ष्म अभ्यासाने त्यांच्या असे लक्षात आले की, परंपरागत पंचांगात केलेले अशुद्ध गणित व घेतलेली ग्रहस्थितीची स्थूलमाने या चुकांमुळे ऋतुकाल तसेच पंचांगात दाखवलेल्या ग्रहस्थितीचा प्रत्यक्षातल्या ग्रहस्थितीशी मेळ बसत नाही. तेव्हा ही विसंगती दूर करण्यासाठी त्यांनी पंचांग सुधारण्यासाठी बरेच दिवस आपला बहुमोल वेळ खर्च केला. पण त्यांच्या हयातीत हा उद्योग पूर्णत्वास गेला नाही. मात्र लो.टिळकांसारख्या त्यांच्या नामवंत शिष्याने राजकारणाच्या धकाधकीतही गुरुऋण जाणून व स्वत:स त्यात असलेला रस म्हणूनही ही चळवळ पुढे नेली. केरुनानांच्या पुरोगामी विचारसरणीचे द्योतक म्हणजे स्त्रियांच्या सामाजिक सुधारणेस त्यांचा पाठिंबा होता. शिवाय ते मुलींच्या शाळेच्या व्यवस्थापक मंडळावर होते, श्रीमती रमाबाई रानडे यांच्या प्रेरणेने भरणाऱ्या स्त्रियांच्या सभांना हजर राहून त्यांचे शिक्षण करत. स्त्रियांना जड विषयांऐवजी गृहजीवनोपयोगी शिक्षण देण्याच्या मताचे ते होते.

अशा गहन विषयांच्या व्यासंगात गढलेल्या केरुनानांना शास्त्रीय संगीत, संगीत नाटके व स्वतः पियानो वाजवण्याचीही आवड होती. शिवाय किर्लोस्कर नाटक मंडळीत त्यांचे जाणेयेणे होते. नाटकांच्या तालमींना हजर राहून ते मोरोबा वाघोलीकर आणि बाळकोबा नाटेकर या गायक नटांना गाण्याच्या अतिरेकाने नाटकाचा रसभंग होतो, असा सल्ला देत असत. त्यांच्या या गुणांवर लुब्ध होऊन अण्णासाहेब किर्लोस्करांनी आपले ‘सौभद्र’ हे नाटक त्यांना अर्पण केले आहे. असे हे थोर व्यासंगी पुरुष दि.१९ मार्च १८८४ रोजी निधन पावले. केरुनाना दिवंगत झाल्यावर टाइम्स ऑफ इंडियाने वाहिलेल्या श्रद्धांजलीत, “प्रो.छत्रे यांना जर युरोपात पद्धतशीर शिक्षण मिळाले असते तर ते एक युगप्रवर्तक शास्त्रज्ञ म्हणून गाजले असते” असे म्हटले होते. त्यावरून त्यांचा मोठेपणा ध्यानात येईल. !! केरुनाना छत्रे यांना त्यांच्या पुण्यस्मरणार्थ अनंत विनम्र अभिवादन !!

**- संकलन तथा सुलेखन -**
**केजीएन: श्री के.जी.निकोडे गुरुजी (से.नि.प्राथ.शिक्षक.)**
**मु.पो.ता.गडचिरोली.**
**फक्त दूरभाष-**
**७१३२७९६६८३.**

# सोलापुरात भाजपची मोठी खेळी, लोकसभेसाठी या तरुण नेत्याची उमेदवारी

महायुतीचं जागावाटप आता लवकरच निश्चित होणार आहे. भाजपकडून लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील 20 उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. असं असलं तरी 28 जागांचे उमेदवार अजून जाहीर करण्यात आलेले नाहीत. या सर्व जागांवर महायुतीतील घटक पक्षांकडून वेगवेगळे दावे केले जात आहेत. असं असताना सोलापुरातून मोठी बातमी येत आहे. सोलापुरात महाविकास आघाडीच्या संभाव्य उमेदवार आमदार प्रणिती शिंदे यांचा पराभव करण्यासाठी भाजप एका तरुण आमदाराला संधी देणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. काँग्रेसच्या आक्रमक नेत्याला आक्रमक नेत्याकडून उत्तर देता या हेतून भाजपने आमदार राम सातपुते यांची सोलापूर लोकसभेसाठी निवड केल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. त्यामुळे सोलापूरची लोकसभेची लढत ही अतिशय रंगतदार होण्याचे संकेत मिळताना दिसत आहेत. सोलापूर लोकसभेसाठी भाजपकडून आमदार राम सातपुते यांचं नाव जवळपास निश्चित झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. विश्वनीय सूत्रांनी ‘टीव्ही 9 मराठी’ला याबाबत माहिती दिली आहे. राम सातपुते यांना पक्षाकडून कामाला लागण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सोलापूरमध्ये गेल्या अनेक



दिवसांपासून भाजपकडून कुणाला उमेदवारी दिली जाणार? या मुद्द्यावरुन सातत्याने चर्चा सुरु होत्या. दुसरीकडे काँग्रेसकडून आमदार प्रणिती शिंदे यांची उमेदवारी निश्चित मानली जातेय. तशा सूचना त्यांना वरिष्ठांकडून देण्यात आल्या आहेत. त्यानंतर प्रणिती शिंदे यांच्याकडून प्रचाराला सुरुवातही झाली आहे. त्यांचे मतदारसंघात दौरे सातत्याने सुरु आहेत.

राम सातपुते भाजपचे युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रणिती शिंदे यांना पर्याय म्हणून भाजपकडून युवा चेहरा म्हणून आमदार राम सातपुते यांना उमेदवारी दिली जात असल्याचं मानलं जातंय.

दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक

# वादळ वार्ता

## अब की बार, 400 पार’, लक्ष्य कसे गाठणार?



देशातील सर्वात मोठा पक्ष असलेल्या भाजपने 2019 मध्ये देशातील नऊ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील 58 लोकसभा जागांवर आपली सर्वोत्तम कामगिरी केली होती. हे नऊ राज्ये म्हणजे गुजरात, हरियाणा, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, दिल्ली, चंदीगड आणि दिव दमण आहेत. या नऊ राज्यांमध्ये भाजपच्या मतांची टक्केवारी वाढली. काही राज्यामध्ये मित्र पक्षांचे पाठबळ मिळाले. परंतु, याच मित्र पक्षांमुळे भाजपचे हे टार्गेट कसे पूर्ण होणार याची उत्सुकता आहे. त्यामुळेच भाजपच्या गेल्या लोकसभा निवडणुकीतील राज्यनिहाय कामगिरीवर एक नजर टाकणे गरजेचे आहे.

# बीड लोकसभासाठी ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या नावाची घोषणा होण्याची शक्यता !

**दैनिक वादळ वार्ता बीड/परवेज पटेल**

बीड लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टीच्या वतीने माजी पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांची उमेदवारी जाहीर झाली असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार पक्षाकडून कोण उमेदवार जाहीर होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे . एकेकाळी शरद पवार यांचे खांदे समर्थक म्हणून स्वर्गीय विनायक रावजी मेटे साहेब यांच्या पत्नी व शिवसंग्राम च्या अध्यक्षा ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी बीड लोकसभा निवडणूक लढवावी अशी मागणी जिल्ह्यातील नागरिकासह संपूर्ण महाराष्ट्रातून होत असताना भाजपाकडून पंकजाताई मुंडे यांची अचानक उमेदवारी जाहीर झाली तर दुसरीकडे शरद पवार व ज्योतीताई विनायकराव मेटे यांची चर्चा झाली कदाचित बीड लोकसभेची उमेदवार म्हणून ही लवकरच त्यांच्या नावाची घोषणा होण्याची शक्यता दिसत आहे ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्याकडे लवकरच तुतारी माणूस पक्षाचे चिन्ह हातात घेतील असा अंदाज वर्तविला जात आहे . दरम्यान ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी लोकसभा निवडणूक लढवण्यास संदर्भात मोन पाळले असून उमेदवारी स्वीकारावी अशी मागणी बीड जिल्ह्यासह राज्य भरातून मोठ्या प्रमाणात केले जात आहे दरम्यान दिनांक १८ /०३/ २०२४ रोजी बीड येथे





शिवसंग्रामच्या पदाधिकाऱ्याची बैठक बोलवण्यात आली आहे या बैठकी नंतरच पुढील चित्र स्पष्ट होणार आहे. महत्त्वपूर्ण बैठक आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आज दिनांक १८ मार्च २०२४ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता. शिवसंग्राम भवन नगर रोड, बीड येथे महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात येत आहे. या महत्त्वपूर्ण बैठकीस बीड जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी न चुकता हजर रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## सोमेश्वर येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार पक्षाच्या कार्यालयाचे उद्घाटन संपन्न

**वादळवार्ता/सोमेश्वर**

दिनांक १५ मार्च रोजी सोमेश्वर येथील जनसंपर्क कार्यालय राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार साहेब पक्षांचा कार्यालयाचे उद्घाटन सोहळा संसदरन्त खासदार सौ. सुप्रिया ताई सुळे यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी पंचक्रोशीतील तरुणांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार माननीय राजेंद्र बाप्पू जगताप जि.प गट प्रमुख यांच्या हस्ते प्रवेश



केला या प्रसंगी मा प्रदीप शेंडकर युवक उपाध्यक्ष मा,सागर मदने युवक युवक उपाध्यक्ष, मा प्रदीप कणसे चिटणीस, मा चारहास शिंदे उपाध्यक्ष मा राजेंद्र लकडे चिटणीस, सौ प्रियंकाताई शेंडकर युवती अध्यक्ष, सौ नुसरत इनामदार कार्य अध्यक्ष, सौ सोनाली गायकवाड, सौ आरती गायकवाड, सौ सोनाली गायकवाड सरचिटणीस, सौ घाडगे ताई तसेच युवा उघोजक दादु (शेठ )मांगडे पाटील, राजेंद्र गायकवाड, सुधीर गायकवाड संभाजी पाटील होळकर बाळासाहेब जगताप राहुल जाधव, वाघळवाडी गाव प्रमुख किरण गायकवाड ओंकार साळुंखेसह आदि कार्यकर्ते उपास्थित होते .

## बिटरगाव येथे महिला पोलीस पाटील यांचा सत्कार संपन्न

**सौ.मीनल (ताई )साठे यांच्या हस्ते या सर्वांचा सत्कार करण्यात आला**



**दैनिक वादळ वार्ता सोलापूर/विश्वास चोपडे**

दि. १५ मार्च रोजी बिटरगाव येथे महिला पोलीस पाटील यांचा सत्कार समारंभ ठेवण्यात आला होता या कार्यक्रमाचे आयोजन अँड. बी. डी. पाटील(बप्पा) व मा. उपसरपंच अमरजीत पाटील यांनी माझी लाडकी लेक म्हणून पंचक्रोशीतील महिला पोलीस पाटील सौ.मोनाली अतुल कोलते(पाटील) बिटरगाव, सौ.प्रीती सचिन शिंदे (उपासे) पाटील ,शिंगेवाडी, व सौ.नीलम मोरे पाटील मुंगशी तसेच सौ.कमल सूर्यकांत महाडिक सरपंच मुंगशी, संत कुर्मुदास सहकारी साखर कारखाना संचलिका सौ.संध्याराणी धनाजी खरात यांचा सत्कार माढ्याच्या कर्तव्यदक्ष नगराध्यक्ष सौ.मीनल (ताई )साठे यांच्या हस्ते या सर्वांचा सत्कार करण्यात आला, माढा उपनगराध्यक्ष सौ.कल्पना (ताई) जगदाळे यांचा सत्कार मा. उपसरपंच सौ. वर्षा संजय नागणे यांच्या हस्ते करण्यात आला तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेश्मा ताई संजय चव्हाण यांनी केला कार्यक्रमास लोणी गावचे सरपंच गणेश नाडकर सूर्यकांत महाडिक, खरात गुरुजी आप्पा शिंदे ग्रामपंचायत सदस्य शिंगेवाडी, हेमंत शिंदे अर्जुन शिंदे संतोष परबत, संजय नागणे, अर्जुन लोंढे, भजनदास कोलते, लक्ष्मण खंडागळे ,हनुमंत लोंढे (मेजर ) हनुमंत पांगरे ,दिलीप व्यवहारे ,मच्छिंद्र दुपारे, शिवाजी दुपारे, इतर सर्व गावकरी मंडळीच्या उपस्थित कार्यक्रम संपन्न झाला.

## अखेर कात्रज-कोंढवा रस्त्याच्या भूसंपादना साठी राज्य शासनाने दिला १४० कोटी रुपये निधी

**रस्त्याच्या कामाला गती मिळणार**

**दैनिक वादळ वार्ता पुणे/पंकज भंडारी**

पुणे :दक्षिण पुण्यातील महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या कात्रज- कोंढवा रस्तारुंदीच्या भूसंपादना साठी राज्य शासनाने सुमारे १४० कोटी रुपये महापालिकेला दिले आहेत. अतंत्य वर्दळीच्या या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम भूसंपादना अभावी रखडले होते. शासनाचा निधी उपलब्ध झाल्याने रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामाला गती मिळणार आहे. महापालिकेच्यावतीने कात्रज- कोंढवा या बाह्यवळण रस्त्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सुरवातीला ८४ मी. रुंद या रस्त्याच्या कामात भूसंपादनाचा मोठा अडथळा असल्याने प्रशासनाने रस्ता रुंदी ५० मी. पर्यंत कमी केली आहे. यानंतरही येथील काही जागा मालकांनी टीडीआर, एफएसआय ऐवजी रोखीने मोबदला मिळावा, अशी मागणी कायम ठेवल्याने राजस सोसायटी चौक ते खडीमशीन दरम्यानच्या अवघ्या पावणेचार कि.मी. रस्त्याचे काम गेली काही वर्षे रेंगाळले आहे. रस्त्याच्या दुतर्फा झालेली मोठी लोकवस्ती आणि जड वाहतुकीच्या अत्यंत रहदारीच्या या मार्गावर सातत्याने होणारे अपघात आणि वाहतूक कोंडी यामुळे मागील पाच वर्षात नागरीक मेटाकुटीला आले आहेत. या रस्त्याचे काम लवकर व्हावे यासाठी या मार्गाला राष्ट्रीय महामार्ग घोषित करण्यात आले आहे. यामुळे सातारा रस्त्यावरील आंबेगाव येथील वंडरसिटी ते राजस सोसायटी चौका दरम्यानच्या उड्डाणपुलाच्या कामाला केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध झाला आणि कामही सुरू झाले. परंतू उर्वरीत रस्त्याचे काम भूसंपादनाअभावी जैसे थेच राहीले. राज्य शासनाने भूसंपादनासाठी २०० कोटी रुपये निधी द्यावा,अशी मागणी महापालिका प्रशासनाकडून सातत्याने करण्यात येत होती. याला राज्य शासनाने सकारात्मक प्रतिसाद देत निधीची घोषणा देखिल केली. परंतू घोषणेनंतर मागील सहा महिन्यांत प्रत्यक्षात निधी उपलब्ध झाला नाही. अखेर लोकसभा निवडणुकीची आचारसंहितेची आचार संहिता लागू होण्याच्याअगोदरकाहीतासराज्यशासनाने भूसंपादनासाठी येणाऱ्या खर्चाच्या निम्मी रक्कम अर्थात १३९ कोटी ८३ लाख रुपये महापालिकेला देण्याचा शासन आदेश काढला आहे. भूसंपादनासाठी २७९ कोटी ६६ लाख रुपये खर्च येणार असून उर्वरीत रक्कम महापालिका देणार आहे.

# पशु सेवा व सामाजिक कार्ये करणार वडवणी तालुक्यातील रत्न डॉ. चोले

**स्वच्छ प्रतिमेच पारदर्शी व्यक्तिमत्व डॉ . चोले मुक्या जनावरांसाठी बनतायत जीवदायक**

**पशुसेवा हीच ईश्वर सेवा हे ध्येय राखून काम करणार - डॉ. सिद्धेश्वर चोले**

**वादळवार्ता/वडवणी**

बीड जिल्हा हा उडतोड मजूरांचा जिल्हा आहे. या बीड जिल्ह्यामध्ये, ऊस तोडी साठी ४ महिने ऊस तोड मजूर स्थलांतर करत असतात. त्यांच्या पाळीव प्राण्यांची, खूप दैनिय अवस्था यामध्ये पाहायला मिळत असते. या डिजिटल युगामध्ये पाळीव प्राणी पाळणे हे आता कमी प्रमाणात दिसत आहे. कारण दिवसेंदिवस या मुक्या प्राण्यांना आजार वाढत आहेत. मात्र या आजारावर, नियंत्रण आणण्यासाठी धावपळ सुरु असणार व अल्प दरात या पशु प्राण्यांना एक नवजीवन देणारा नेतृत्व, शेतकऱ्यांच्या मनावर, व समोरच्या पशुपालन बांधवांच्या चेहऱ्यावर हास्य आणण्याचं काम करणारा वडवणी तालुक्यातील एक युवा डॉक्टर सिद्धेश्वर चोले. हे आपल्या वडवणी तालुक्यातील हजारो प्राण्यांना जीवनदान देण्याचे काम करतात. एका शेतकरी बापाचा मुलगा, आपल्या बापाच्या कष्टाची जाण करून, सामाजिक क्षेत्रात सक्रिय असणारे डॉक्टर सिद्धेश्वर चोले, हे आज वडून तालुक्यातील हजारो पाळीव प्राण्यांना जीवदान देण्याचे काम करतात. पशु सेवा हीच ईश्वर सेवा म्हणून काम करणारे उडवून तालुक्यातील एकमेव डॉक्टर, व सामाजिक क्षेत्रातील कुठल्याही कार्यात अग्रेसर असणारे डॉक्टर हल्ली कमी पाहायला मिळतात. डॉक्टर म्हणजे देवाचे दुसरे रूप, मात्र आता हे रूप कधी पाहायला मिळत



नाही मात्र तालुक्यात व त्यात मध्ये डोंगर पट्ट्यात , आपल्या कामाने सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मनावर सिद्धेश्वर चोले हे राज कारताना दिसत आहेत. सिद्धेश्वर चोले यांच शिक्षण खूप कठीण परिश्रमातून झाल असून, त्यांना आता तालुक्यात एक प्रसिद्ध डॉक्टर व सामाजिक कार्यकर्ते अशा नजरेने त्यांच्याकडे पाहिले जात. आपल्या आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करून, सर्वसामान्य माणसा माणूस कमावणे , व पशुपालक यांना जीवदान देणे हेच आयुष्याच एकमेव जगण्याचे ध्येय आहे. असे डॉक्टर सिद्धेश्वर यांनी सांगितले. माझ्या आयुष्यात जोपर्यंत मी पशु सेवा करेल, पशुसेवा हीच ईश्वर सेवा म्हणून हे कार्य करत राहणार. अल्प दरात पशुसेवा करत राहणार. व सामाजिक कार्यात देखील , वडवणी तालुक्यातील काही प्रश्न असतील तर नक्कीच त्याचा सोडवण्याचा प्रयत्न मी करत असतो. उद्या डॉक्टरांच्या अभिष्टचिंतन दिनानिमित्त सामाजिक कार्यक्रम आहेत. अनाथ मुलांना साहित्य वाटप आहे. तालुका भरातून त्यांना, अभिष्टचिंतना निमित्त त्यांना तालुका भरातून शुभेच्छा येताना दिसत आहे. तर तर सामाजिक कार्यक्रमाने त्यांचा वाढदिवस उत्साहात साजरा होणार असल्याचे आदित्य आंधळे यांच्याकडून समजते आहे.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )